LOKSATTA

Tuesday, Feb 23, 2010.

# 'टाटा क्रुसीबल कॅम्पस क्वीझ २०१०' मध्ये 'आयएमटी' विजयी

'टाटा क्रुसीबल कॅम्पस क्वीझ २०१०' च्या सहाव्या भागात नागपूर विभागात घेण्यात आलेल्या स्पर्धेत आयएमटी महाविद्यालयाने विजेतेपद पटकाविले. अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या लढतीत आयएमटी महाविद्यालयाच्या नेहा कटियाल आणि सौम्याजीत सामंत यांनी महाविद्यालयाला विजेतेपद मिळवून देण्याची मोलाची कामगिरी बजावली. विजेता संघ एप्रिल महिन्यात मुंबईत होणाऱ्या अंतिम फेरीत सहभागी होणार आहे.

या स्पर्धेच्या २०१० च्या सत्रासाठी नागपूर, मणिपाल, रांची आणि गुवाहाटी या शहरांची निवड करण्यात आली. त्यामुळे यंदा २० शहरात ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत यंदा आव्हानात्मक, नवीन फॉरमॅटचा समावेश करण्यात आला आहे. यावेळी स्पर्धेचे उपविजेतेपद विश्वेश्वरय्या राष्ट्रीय प्रौद्योगिकी महाविद्यालयाच्या मिळाले. यावेळी विश्वेश्वरय्या राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थेचे कुलसचिव भास्कर गणवीर यांच्या हस्ते विजेत्यांना पुरस्कार देण्यात आले. विजेत्यांना ७५ हजार, तर उपविजेत्याला ३५ हजार रुपयांचे पारितोषिक पुरस्कार देण्यात आला.